उल्हासनगर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग

१८/६/२४
6:00

दिनांक : १८/०६/२०२४

# प्रेसनोट

आज दि.१८/०६/२०२४ रोजी महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांनी पावसाळ्यापूर्वी शहरातील मोठ्या नाल्यांची व रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी केली व आढावा घेतला. यावेळी १) नेताजी येथील न्यु इंग्लिश शाळेमागील व २५ सेक्शन, नुतन नगर, हीरापुरी चौक, उल्हसनगर ५ येथील रस्त्यांची कामे तसेच २) उल्हासनगर स्टेशन जवळील नाला ३) सी.एच.एम. कॉलेज, उल्हासनगर-३ जवळील नाला ४) भरतनगर, उल्हासनगर ४ येथील नाल्यांची पाहणी करण्यात आली व नाले सफाईची कामे वेगाने पूर्ण करणेबाबतचे निर्देश महापालिका आयुक्त यांनी संबंधित ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभाग प्रमुख व स्वच्छता निरीक्षक यांना दिले. मोठ्या नाल्यांबरोबरच छोट्या नाल्यांचेही काम सुरू असल्याबाबत त्यांनी सांगितले व मोठ्या व छोट्या नाल्यांचे काम वेगाने करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त, किशोर गवस, उप-आयुक्त, डॉ. सुभाष जाधव, शहर अभियंता, सा.बां.वि. तरुण सेवकानी, पा.पु.विभाग, परमेश्वर बुडगे, नोडल अधिकारी (अ.बां.नि.वि.) तथा सहा. आयुक्त गणेश शिंपी, सहा. आयुक्त मनीष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक, विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक, एकनाथ पवार, संबंधित ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित स्वच्छता निरीक्षक, जनसंपर्क विभागातील संजय पवार व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१८/६/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with OKEN Scanner